जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2020
पुढारी

# 'खेलो इंडिया' स्पर्धेत रोहनला सुवर्णपदक

मुरगूड (पुढारी वृत्तसेवा) : भुवनेश्वर (ओडिसा) येथे झालेल्या



खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स २०२० च्या ग्रिको रोमन स्टाईल कुस्ती स्पर्धेत लोकनेते सदाशिवराव मंडलिक कुस्ती संकुलचा मल्ल रोहन रंडेने सुवर्णपदक पटकावले. अंतिम लढतीत रोहनने पंजाबच्या मनप्रितसी अटीतटीची लढत दिली. ८-७ गुण फरकावर शेवटच्या ३० सेकंदांत रोहनने 'बॅक थ्रो' या डावावर मनप्रितला चितपट केले. शिवाजी विद्यापीठाला पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. रोहनला कुस्ती प्रशिक्षक दादासो लवटे, वस्ताद सुखदेव येरुडकर, सागर देसाई, दयानंद खतकर यांचे मार्गदर्शन मिळाले व खासदार संजय मंडलिक, वीरेंद्र मंडलिक, चंद्रकांत चव्हाण, अण्णासो थोरवत प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, नामदेव मेंडके यांचे प्रोत्साहन मिळाले.

# संशोधन म्हणजे ज्ञान शोधण्याची कला

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन : राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाची सांगता



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाच्या सांगता समारंभामध्ये बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत अन्य मान्यवर.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
विज्ञान हे संशोधनाचे मुख्य प्रवेशद्वार आहे. प्रत्येक जण प्रत्येक वेळेस संशोधन करत असतो. संशोधन म्हणजे ज्ञान शोधण्याची कला आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागामार्फत राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाच्या सांगता समारंभामध्ये अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विविध भाषांमध्ये विज्ञानाचे विपुल प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे. याचे विद्यार्थ्यांनी वाचन करणे आवश्यक आहे. विज्ञान दिनाचा मूळ हेतू हा समाजामध्ये वैज्ञानिक जाणीव जागृत निर्माण करणे हा आहे. शाळा, महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानवादी दृष्टिकोन रुजवण्यासाठी सातत्याने विविध वैज्ञानिक संशोधनात्मक उपक्रम राबवणे गरजेचे आहे.

विज्ञानातील विवेकपूर्ण विचार हे समाजाला अंधश्रद्धेपासून दूर ठेवण्याचे मुख्य काम करत असते. संशोधक वृत्तीचे कार्य पूर्ण होण्यासाठी त्याला पूरक वातावरण उपलब्ध होणे आवश्यक आहे. संशोधनामुळे माणूस सक्षम बनतो. प्रश्न विचारण्याचे थांबवल्यास ज्ञानार्जन थांबते, विकास थांबतो. जी व्यक्ती विज्ञानवादी जीवनशैली अवलंबिते ती व्यक्ती आनंदी जीवन जगू शकते.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, भारतीय महिला शास्त्रज्ञांचे विज्ञानामध्ये फार मोठे योगदान आहे. विद्यार्थ्यांनी जिज्ञासू, अभ्यासू, चिकित्सक वृत्ती जोपासून समाजाच्या प्रगतीसाठी विज्ञानाचा उपयोग केला पाहिजे. अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थिनी स्वरूपा फडके यांनी मनोगत व्यक्त केले.

यानिमित्त निबंध, वक्तृत्व, प्रश्नमंजूषा, विज्ञान प्रदर्शन, शालेय स्तरावरील वादविवाद स्पर्धा झाल्या. या स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा कुलगुरूंच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी आढावा सादर केला. आदित्य नागवेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. माधव भिलावे यांनी आभार मानले. अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभाये उपस्थित होते.

# प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया लवकरच

## उदय सामंत । शिवाजी विद्यापीठात कामकाजासंबंधी आढावा बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठातील नॅनो सायन्स व तंत्रज्ञान विभागाच्या सभागृहात शनिवारी झालेल्या आढावा बैठकीत बोलताना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत. शेजारी पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, जिल्हाधिकारी दौलत देसाई, आमदार ऋतुराज पाटील, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण संचालक डॉ. धनराज माने, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर :** राज्यातील प्राध्यापकांची २९०० रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. लवकरच ती भरती प्रक्रिया राबविली जाईल, तसेच शिवाजी विद्यापीठातील बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी एक कोटींचा निधी लवकरच वितरित करण्यात येईल, असे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत जाहीर केले.

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान विभागाच्या सभागृहात शनिवारी मंत्री सामंत यांनी शिवाजी विद्यापीठातील कामकाजासंबंधी आढावा बैठक घेतली. मंत्री सामंत म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील अनेक प्रश्न मंत्रालयात प्रलंबित आहेत, ते प्रश्न सोडविण्यासाठी मुंबईतील मंत्रालयातील कामाचा पाठपुरावा करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने कायमस्वरुपी एका कर्मचाऱ्याची नियुक्ती करावी. त्यामुळे विद्यापीठ व शासनामध्ये समन्वय निर्माण होईल.

शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील एक अग्रणी विद्यापीठ असून, येथील फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर फॉर सायबर सिक्युरिटी अॅन्ड डाटा सायन्सेसचे राष्ट्रीय संस्थेत रुपांतर करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने सर्वसमावेशक स्वरुपाचा प्रस्ताव सादर करावा. विद्यापीठामधील विविध प्रकल्पांसाठी जिल्हा नियोजन मंडळाकडून पाच वर्षांच्या कालावधीत साधारणत: दहा कोटींच्या निधीची तरतूद करता येईल का, यादृष्टीनेही विचार करावा, अशी सूचनाही दिल्या.

यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कुलगुरु डॉ. शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठाविषयी पॉवर पॉईंट सादरीकरण केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

बैठकीला आमदार ऋतुराज पाटील यांच्यासह जिल्हाधिकारी दौलत देसाई, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण संचालक डॉ. धनराज माने, कोल्हापूरचे विभागीय सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ.भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

### एक कोटीचा निधी

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मंजूर करण्यात आलेल्या बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्यात येतील. त्या निधीचा विनियोग विद्यार्थिहित लक्षात घेऊन कशाप्रकारे करणार, त्याचे नियोजन करून प्रस्ताव सादर करण्याची सूचनाही त्यांनी केली.

### सीमावर्ती भागात मराठी महाविद्यालय

महाराष्ट्र-कर्नाटकच्या सीमावर्ती भागात महाराष्ट्राच्या हद्दीत मराठी महाविद्यालय सुरु करण्याचा मानस असून सध्या तो विचार प्राथमिक अवस्थेत आहे. हा विचार पूर्णत: अराजकीय स्वरुपाचा असून कायदा व सुव्यवस्थेला बाधा न पोहोचविता सीमाभागातील मराठी भाषेच्या शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना मराठी शिक्षण देण्यासाठी हे महाविद्यालय असावे, असा हेतू आहे. त्यादृष्टीने योग्य स्थळाची निवड करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी दौलत देसाई यांना त्यांनी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2020
पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाच्या सांगता समारंभात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. एस. पाटील आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# संशोधन म्हणजे ज्ञान शोधण्याची कला

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; राष्ट्रीय विज्ञान सप्ताह समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विज्ञान हे संशोधनाचे मुख्य प्रवेशद्वार आहे. प्रत्येकजण संशोधन करीत असतो. संशोधन म्हणजे ज्ञान शोधण्याची कला आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागामार्फत राजर्षी शाहू सभागृहात आयोजित राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाच्या सांगता समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय महिला शास्त्रज्ञांचे विज्ञानामध्ये मोठे योगदान आहे. विद्यार्थ्यांनी जिज्ञासू, अभ्यासू, चिकित्सक वृत्ती जोपासून समाजाच्या प्रगतीसाठी विज्ञानाचा उपयोग केला पाहिजे. यावेळी अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थिनी स्वरूपा फडके यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी देश व जागतिक पातळीवरील महिला शास्त्रज्ञांनी मूलभूत संशोधनाबाबत दिलेल्या योगदानाची चित्रफीत दाखविण्यात आली.

राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाच्या निमित्ताने प्राणीशास्त्र विभागामार्फत घेण्यात आलेल्या निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शन स्पर्धा, शालेय स्तरावरील वादविवाद स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा कुलगुरूंच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी आढावा सादर केला. आदित्य नागवेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. माधव भिलावे यांनी आभार मानले. यावेळी अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभाये उपस्थित होते.

# बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी एक कोटी

## उच्च तंत्रशिक्षणमंत्री सामंत; विद्यापीठात आढावा बैठक, प्राध्यापकांची रिक्त पदे भरणार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मंजूर केलेल्या बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी एक कोटी रुपयांचा निधी लवकरच वितरित करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज येथे दिली. शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान विभागाच्या सभागृहात आज झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. राज्यातील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाहीसुद्धा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री श्री. सामंत म्हणाले, "२०१० पासून विविध विद्यापीठांमध्ये अध्यासनांचा आढावा घेऊन ती सुरळीत चालण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिक साहाय्य करण्याचे धोरण स्वीकारले आहे. येत्या काळात उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सचिवांसमवेत



प्रत्यक्ष विद्यापीठात जाऊन विद्यापीठे व संस्थाचालक यांच्या प्रस्तावांवर समोरासमोर चर्चा करून ते मार्गी लावण्यात येतील. जेणे करून त्यांचा मंत्रालयात खेटे घालण्याचा त्रास कमी होईल. त्याचप्रमाणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधण्यात येईल."

शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील अग्रणी असून येथील 'फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर फॉर सायबर सिक्युरिटी अँड डाटा सायन्सेस'चे राष्ट्रीय संस्थेत रूपांतर करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने सर्वसमावेशक



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात झालेल्या आढावा बैठकीत बोलताना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत. या वेळी शेजारी पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, जिल्हाधिकारी दौलत देसाई, आमदार ऋतुराज पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, उच्च व तंत्रशक्षणमंत्री डॉ. धनराज माने, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील.**

स्वरूपाचा प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना त्यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना केली.

या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वागत केले. कुलगुरू डॉ. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठाविषयी पॉवरपॉइंट सादरीकरण केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

बैठकीला आमदार ऋतुराज पाटील, जिल्हाधिकारी दौलत देसाई, पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. धनराज माने, कोल्हापूरचे विभागीय सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव आणि व्यवस्थापन परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

### टीचर्स ट्रेनिंगचा प्रोजेक्ट

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी इस्रो आणि आय.आय.टी. (मुंबई) यांच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठाचा स्वत:चा खासगी सॅटेलाईट विकसित करण्याचा मानस असल्याचे मंत्री उदय सामंत यांना सांगितले. त्यावर, हा चांगला उपक्रम असून त्यासंदर्भात आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे सांगितले. तसेच, आपल्या कार्यक्षेत्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील प्रत्येकी पाच महाविद्यालये निवडून त्याठिकाणी सॅटेलाईट अगर नेटवर्कच्या माध्यमातून टीचर्स ट्रेनिंगचा पायलट प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने तयारी करावी, अशी सूचना त्यांनी केली.

### सीमाभागात मराठी महाविद्यालय

महाराष्ट्र-कर्नाटकच्या सीमावर्ती भागात महाराष्ट्राच्या हद्दीत मराठी महाविद्यालय सुरू करण्याचा मानस असून सध्या तो विचार प्राथमिक अवस्थेत आहे. हा विचार पूर्णत: अराजकीय स्वरूपाचा असून कायदा व सुव्यवस्थेला बाधा न पोहोचविता सीमाभागातील मराठी भाषेच्या शिक्षणापासून वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना मराठी शिक्षण देण्यासाठी हे महाविद्यालय असावे, असा हेतू आहे. त्या दृष्टीने योग्य स्थळाची निवड करावी, अशी सूचना जिल्हाधिकारी दौलत देसाई यांना मंत्री श्री. सामंत यांनी केली. विद्यापीठामधील विविध प्रकल्पांसाठी जिल्हा नियोजन मंडळाकडून पाच वर्षांच्या कालावधीत साधारणत: दहा कोटींची तरतूद करता येईल का, या दृष्टीनेही विचार करावा, अशी सूचनाही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली.

संडे अँकर । आय. एच. पठाण : वारणा महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात, शाहिरी कार्यक्रम, व्याख्यानाचे आयोजन

# शिवरायांनी मानवतावादी तत्त्वज्ञान अंमलात आणले

इतिहास संशोधनाच्या माध्यमातून मराठ्यांचा खरा इतिहास इंग्रजी भाषेतून यावा आणि तो आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श, उदात्त आणि सर्वधर्मसमभाव तत्त्वांच्या अभ्यासावरच देशातील प्रश्न सोडविले पाहिजेत, असे डॉ. वासंती रासम यांनी सांगितले.

लोकमत न्यूज नेटवर्क

**वारणानगर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या अगोदर स्वातंत्र्य असे काही नव्हतेच. स्वराज्य संकल्पक शहाजी राजे आणि स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळे स्वातंत्र्याची कल्पना अंमलात आली. छत्रपती शिवाजी महाराज हे स्वयंभू व्यक्तिमत्त्व होते. सत्य-असत्य, धर्म-अधर्म यांच्या कसोटीवर उतरलेले ते एक महान राजे होते. मानवतावादी तत्त्वज्ञान आत्मसात करून त्यांनी ते अंमलात आणले, असे प्रतिपादन इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. आय. एच. पठाण यांनी येथे केले.



**वारणानगर येथील वारणा महाविद्यालयात मराठा इतिहास व्याख्यानमाला आणि मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. आय. एच. पठाण यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पी. एस. पाटील, डॉ. वासंती रासम, प्रा . डॉ. सुरेखा शहापुरे, डॉ. सर्जेराव जाधव उपस्थित होते.**

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये मराठी भाषा गौरव दिन आणि शिवाजी विद्यापीठाच्यावतीने सुरु असलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज व मराठा इतिहास व्याख्यानमाला अंतर्गत 'मराठ्यांचा मध्ययुगीन इतिहास' या विषयावर डॉ. पठाण यांनी व्याख्यान दिले.

यावेळी शाहीर रंगराव पाटील आणि सहकारी यांचा 'शिवशाही ते लोकशाही' या विषयावरील रंगतदार आणि प्रबोधनपर शाहिरी कार्यक्रम झाला.

वारणा शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, वारणा भगिनी मंडळाच्या उपाध्यक्षा स्नेहा कोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे होत्या. संयोजन मराठी विभागप्रमुख डॉ. सर्जेराव जाधव यांनी केले. संयोजन साहाय्य प्रा. डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, डॉ. बी. के. वानोळे, प्रबंधक बाळासाहेब लाडगावकर, सुभाष शिरगावे, विजय खिलारे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय ज्योती माने आणि ऐश्वर्या पाटील यांनी करून दिला. डॉ. सर्जेराव जाधव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. प्रीती शिंदे-पाटील आणि तेजश्री पाटील, अश्विनी पाटील यांनी केले.


याप्रसंगी उपप्राचार्य पी. एस. पाटील, माजी प्राचार्य डॉ. एस. एस. पाटील, डॉ. के. जी. जाधव कोल्हापूर, अर्बन बँकेचे निवृत्त शाखाधिकारी अनील कसबेकर, महानगरपालिकेचे निवृत्त अधिकारी कृष्णाजी साळोखे उपस्थित होते. डॉ. बी. के. वानोळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAR 2020
Times of India

# Marathi-medium college to be set up at Maha-K'taka border

**Vivek.Waghmode**
**@timesgroup.com**

Arjun Takalkar



The education minster after reviewing the work of educational institutes in Kolhapur

**Kolhapur**: The state government is planning to set up a Marathi-medium college in the Maharashtra-Karnataka border area to help the Marathi-speaking people of the area get education in their mother tongue, said Uday Samant, the higher and technical education minister, on Saturday.

He was speaking to reporters at the circuit house in the city after reviewing the work of educational institutes in Kolhapur.

Minister Samant directed district collector Daulat Desai to identify the land in the border area so that the government can initiate the process to set up the college.

"We are working on filling up the vacant professor posts in the colleges across the state. We will soon fill 2,900 vacant posts," he added.

Later, addressing the students at a convocation ceremony of the D Y Patil group of institutions, Samant said that students should learn to be humble even after they achieve success in their respective fields.

Devanand Shinde, the vice-chancellor of Shivaji University, who was the guest of honour for the programme, said, "High-quality professionals are needed in all sectors for the society's development. There are several opportunities in the solar energy and pharmaceutical sectors and students should grab these opportunities."

At the convocation ceremony, 866 students from the D Y Patil College of Engineering and Technology, Kasaba Bawada; D Y Patil Technical Campus, Talsande; and D Y Patil College of Engineering, Salokhenagar, Kolhapur, were awarded their degrees.

0 1 MAR 2020

पुढारी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राचार्य, संस्थाचालकांचे प्रश्न सोडविणार

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत; प्राचार्य, संस्थाचालकांसमवेत बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील विद्यापीठांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. शिक्षण संस्थाचालक, प्राचार्य यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आर्थिक ताकद द्यायला महाविकास आघाडी सरकार कमी पडणार नाही, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.


शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सिनेट सभागृहात प्राचार्य, संस्थाचालक यांची बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. मंत्री सामंत म्हणाले, प्राचार्य व संस्थाचालकांचे प्रश्न समजून घेणार आहे. शिक्षण क्षेत्रातील विविध घटकांसमेवत घेतलेली आढावा बैठक वाया जाणार नाही. राज्याचा शैक्षणिक गाडा व्यवस्थित चालविण्याचा प्रयत्न राहणार आहे.

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, प्राध्यापकांच्या जागा रिक्त असल्याने काम करताना अडचणी येत आहेत. प्राचार्यांची मुदत पाच वर्षांची करण्यात आल्याने अडचणी येतात. प्राचार्यांचा कालावधी वाढवावा, अशी मागणी त्यांनी केली.

प्राचार्य नंदकुमार निकम म्हणाले, प्रतिनिधी पातळीवर प्रश्न सुटत नसून प्रत्येक गोष्टीसाठी न्यायालयात जावे लागते. त्यामुळे मानसिक खच्चीकरण होत आहे. प्राध्यापक भरती नाही, गेल्या काही वर्षापासून महाविद्यालयांना वेतनेतर अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे शैक्षणिक साहित्य खरेदी करताना अडचणी येत आहेत.

माजी आ. के. पी. पाटील म्हणाले, तासिका तत्त्वावरील प्राध्यापक पदे मंजूर आहेत. परंतु पत्रव्यवहार करूनही त्यांचे पगार झालेले नाहीत. याप्रसंगी प्रताप माने, प्राचार्य सचिन बेडके, प्रा. किसन कुराडे यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी आ. ऋतुराज पाटील, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण संचालक डॉ. धनराज माने, शिवसेना जिल्हाप्रमुख विजय देवणे उपस्थित होते.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर यावेळी प्राचार्यांनी मते मांडली. यावर उत्तर देताना मंत्री सामंत यांनी राज्यस्तरावर पाच तज्ज्ञ लोकांची समिती नेमण्यात येणार असल्याचे सांगितले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित प्राचार्य, संस्थाचालक यांच्या बैठकीत बोलताना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत. डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. धनराज माने, आ. ऋतुराज पाटील, विजय देवणे.**

**(छाया : तय्यब अली)**

### प्राचार्यांच्या कालावधीचा निर्णय शासन घेणार

महाविद्यालयाचा कारभार व्यवस्थित चालण्यासाठी प्राचार्यांना निवृत्तीपर्यंत कायम ठेवा, अशी मागणी उपस्थित संस्थाचालक, प्राचार्यांनी केली. माजी आ. के. पी. पाटील यांनी या निर्णयाचा विचार करण्याची मागणी केली. या प्रश्नावर बोलताना मंत्री सामंत यांनी प्राचार्यांचा कालावधी किती ठेवायचा याचा शासन निर्णय घेईल, असे सांगितले.